# ऑनलाईन मराठी विश्व साहित्य संमेलनाचे उद्घाटन

**पुणे** | दि. ४ (प्रतिनिधी)

**आधुनिक** तंत्रज्ञानाचा वापर करून भारतीय साहित्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ऑनलाईन मराठी विश्व साहित्य संमेलन बुकगंगाने आयोजित केले आहे. www.vishwasahityasammelan.org या संकेतस्थळावर दि. ५ ते १५ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक शंकर सारडा यांच्या हस्ते झाले.

साहित्याचा प्रचार व प्रसार करत जगभरातील साहित्यिक, लेखक, कवी, ब्लॉगर, वाचक, प्रकाशक, विद्यार्थी आणि मीडिया यांना एकत्र आणण्यासाठी हे संमेलन आयोजित करण्यात आल्याचे धनंजय दातार यांनी सांगितले. या वेळी मंदार जोगळेकर, ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ आदी उपस्थित होते. संमेलनाचा ऑनलाईन २४ तास फायदा घेता येणार आहे. यात पुढील ५० वर्षांत मराठी भाषेचे स्थान काय असेल? मराठीसाठी मी काय करतो? वाचनसंस्कृती कमी होत आहे का? मराठी भाषेचे राजकारण आणि समाजकारण? कवी संमेलन, जगभरातील मराठी लेखकांची माहिती गोळा करणे, पुस्तकांची व अनुवादित पुस्तकांची यादी बनविणे, जगभरातील मराठी ब्लॉगर्सची माहिती गोळा करणे असे कार्यक्रम यात होणार आहेत. संमेलनात आवडता लेखक, आवडते पुस्तक, आवडती कविता, आवडता प्रकाशक, आवडता ब्लॉगर, चोखंदळ वाचक, पुस्तक असे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.